myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

# महाकाव्य ते नाट्यपरंपरा : कवी कालिदास यांचे साहित्यिक योगदान – एक समीक्षात्मक अभ्यास

Nita Bhoir
मराठी विभाग
छत्रपती शिक्षण मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय पडघा.
M.A.B.Ed.Maha -Set (Marathi)
Email id -neetabhoir006@gmail.com

गोषवारा

संस्कृत साहित्यातील सुवर्ण युगाचे प्रतिनिधी कवी कालिदास मानले जातात. कवी कालिदास यांचे स्थान साहित्य क्षेत्रात सर्वोच्च मानले जाते. महाकाव्य ते नाट्यपरंपरा या दोन्ही शाखांमध्ये त्यांनी उत्कृष्ट साहित्य निर्मिती केलेली आहे. त्यांच्या या साहित्यकृतीमध्ये रस सिद्धांत, निसर्गचित्रण, प्रेम, कर्तव्य आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब आढळून येते.

कवी कालिदास यांनी महाकाव्य, खंड काव्य आणि नाट्य या तिन्ही साहित्य प्रकारांमध्ये कलात्मक परिपूर्णता साध्य केलेली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या महाकाव्य परंपरेतील आणि नाट्यपरंपरेतील योगदानाचा समीक्षात्मक अभ्यास करणार आहोत.

रघुवंश, कुमारसंभव, ऋतू संहार,अभिज्ञानशाकुंतलम, विक्रमोर्वशीयम् आणि मालविकाग्नीमित्रम् या ग्रंथ व नाटकाच्या आधारे त्यांची काव्यशैली, रससिद्धांत, निसर्गचित्रण, स्त्री प्रतिमा आणि मानवी मूल्यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

की वर्ड्स- कवी कालिदास, महाकाव्य, नाट्य परंपरा, संस्कृत साहित्य, महाकवी, भारतीय संस्कृती.

## प्रस्तावना

संस्कृत साहित्याच्या इतिहासात कवी कालिदास हे अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी महाकाव्य, खंड काव्य आणि नाट्य साहित्य या तिन्ही शाखांमध्ये अद्वितीय साहित्य निर्मिती केलेली दिसून येते. त्यांच्या काव्यात भारतीय संस्कृतीचे दर्शन, निसर्गाशी एकात्मता आणि मानवी भावविश्वाचे सूक्ष्म चित्रण दिसून येते. कवी कालिदासांचे साहित्य हे केवळ

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

काव्यसौंदर्यापुरते मर्यादित नसून ते मानवी जीवन मूल्याचे आणि निसर्गशी असलेल्या सुसंवादाचे दर्शन घडविताना दिसते. त्यांच्या काव्यातील रसप्रधान आणि भाषेतील माधुर्य हे आजही अभ्यासकाला आकर्षित करणारे आहे. कवी कालिदासांनी त्यांच्या साहित्यामध्ये रंगविलेली पात्र ही त्यांच्या अधिकाराप्रमाणे आदर्श रूपात दाखविण्यात आली आहेत. देव ब्राह्मणांविषयी आदर, गुरुजनांवर नितांत श्रद्धा, लोकरंजनासाठी केलेले अथक प्रयत्न, कुलाची कीर्ती वाढवण्यासाठी केलेला त्याग अशा अनेक गुणांनी सजलेल्या पात्रांचे चित्रण कवी कालिदासांच्या साहित्यात आलेले दिसून येते. त्यांनी आपल्या साहित्यात स्त्रियांचे चित्रे रेखाटताना स्त्रियांमध्ये असलेला हळुवारपणा अतिशय सुंदर रीतीने वर्णन केलेला आढळतो. उदाहरणार्थ शकुंतला, मालविका, उमा इ.

संशोधनाची उद्दिष्टे

१) कवी कालिदासांच्या महाकाव्य परंपरेतील योगदानाचा अभ्यास करणे.

२) कवी कालिदासांच्या नाट्यपरंपरेतील वैशिष्ट्यांचा आढावा घेणे.

३) रस सिद्धांत व काव्य शैलीचे विश्लेषण करणे.

४) कवी कालिदासांची काव्यशैली, रस सिद्धांत, निसर्ग चित्रण, स्त्री प्रतिमा आणि मानवी मूल्यांचे विश्लेषण करणे.

५) कवी कालिदासांच्या साहित्याचा आधुनिक संस्कृतीवर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

कवी कालिदासांचा जीवन परिचय

आपला भारत देश हा संस्कृत वाड्.मयाने समृद्ध असलेला आपणास दिसून येतो. अनेक धर्म, तत्त्वज्ञान आणि व्यवहारिक शास्त्र, काव्य, नाटक इत्यादी विषयांवर अनेक पुस्तकांचे छपाई झालेली आहे. आज हजारो वर्षापर्यंतच्या साहित्यकारने आपली बुद्धी वैभव खर्च करून साहित्यात भर टाकली आहे. जसे कल्हनाचे ‘राजतरंगणी’, बाणाचे ‘हर्ष चरित्र’ असे काही प्रमुख ग्रंथ म्हणता येते[1].

कवी कालिदास हे जागतिक साहित्यातील सर्वात प्रसिद्ध परंतु वैयक्तिकरित्या अस्पष्ट व्यक्तींपैकी एक आढळून येतात. भारतीय संस्कृतीवर त्यांचा मोठा प्रभाव असूनही कवी कालिदासांबद्दल ठोस चरित्रात्मक तपशील लक्षणीयरीत्या दुर्मिळ असल्याचे आढळते.

पुरा कवींना गणना प्रसंगी कनिष्ठकाधिष्ठीत कालिदास:|

[1] **कालिदास-वा.वी.मिराशी. पृष्ठ. क्र.१६**

अद्यापि ततुल्य कवेरभावादनामिका सार्थवती बभूव||

अर्थात कवींच्या गणनेत प्रसंगी कालिदासांना कनिष्ठ बोटावर ठेवले गेले. परंतु आज देखील त्यांच्यासारख्या कवींच्या प्रभावामुळे अनामिका नामावली सार्थवती झाली. दुसऱ्या कोणत्याही कवींना त्यांच्याशी बरोबरी करण्यात यश मिळालेले आढळून येत नाही[2].

महाकवी कालिदासांच्या जन्माविषयी अनेक मत मतांतरे आढळून येतात. तसेच साहित्य विषय अनेक विवाद आपणास दिसून येतात. पण तरीही त्यांची साहित्य रचना ही आजही अजरामर असल्याचे आपणास आढळून येते.

कवी कालिदासांच्या व्यक्तिमत्वाविषयी अनेक दंतकथा असलेल्या आपणास आढळतात. जसे,काही विसरवंतांच्यामते ते विक्रमादित्याच्या नवरत्नापैकी एक रत्न होते, तर काही विचारावंताच्या मते एक अतिशय हट्टी व विद्वान राजकन्नेची खोड मोडण्यासाठी दरबारातील काही लोकांनी कपटकारस्थान करून कवी कालिदासांचे तिच्यासोबत लग्न लावून दिले. पण त्या राजकन्यासमोर हे कपट उघडकीस येताच त्या राजकन्येने क्रोधाने त्यांना राजदरबारातुन हाकलून दिले. हा अपमान त्यांना सहन झाला नाही. त्यांनी काली मातेची उपासना करून ते महापंडित झाले. ज्ञान प्राप्ती नंतर ते आपल्या पत्नी समोर येतात पत्नीने त्यांना प्रश्न केला ‘अस्ती कश्चित वांग् विशेष:’? (आपल्या वाणी काही फरक पडला का?) असे विचारतात त्यांनी कुमार संभव, मेघदूत व रघुवंश ही तीन काव्य तिला उस्फूर्तपणे म्हणून दाखविले. पण पुढे त्याने त्या राजकन्नेचा पत्नी म्हणून स्वीकार केला नाही. त्याला दिलेल्या शापानुसार कवी कालिदासांचा अंत एका वैश्येच्या हातून झाला. ही दंतकथा भोज प्रबंध या ग्रंथात वर्णन करण्यात आलेली आहे.

कवी कालिदासांना जागतिक कीर्ती लाभली. सर विल्यम जोन्स यांनी त्यांना ‘भारताचे शेक्सपियर’ ही पदवी बहाल केलेली आहे.[3] कवी कालिदासाला प्राचीन व अर्वाचीन काळातील सर्वांनी कवी कुलगुरू ही पदवी बहाल केलेले दिसून येते.

## कवी कालिदासांचे महाकाव्यपरंपरेतील योगदान

कवी कालिदासांच्या काव्य साहित्याची भाषा सहज, सुबोध रचना, माधुर्य व प्रसाद आढळतो. त्यांची भाषाशैली ही वेधक व सूचक म्हणून योग्य दिसते. पाल्हाळपणा, भडकपणा टाळून व्यंगार्थ व सूचकता त्यांच्या काव्यामध्ये भरपूर प्रमाणात

[2] **कवी कालिदास साहित्य रचना-प्रा. राजेंद्र प्रसाद किसनराव आर्य**

[3] **कालिदास-वा.वी.मिराशी, पृष्ठ क्र.१६**

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

असल्याचे दिसून येते. सुंदर समर्पक उपमा हे कालिदासांचे वैशिष्ट्य मानले जाते. त्यांच्या काव्यात भारतीय संस्कृतीच्या उदात्तेचे, सौंदर्याचे व सद्गुणांचे अप्रतिम चित्र असल्याने भारतीय संस्कृतीचा तो महान उद्गाता ठरविण्यात आला आहे. त्यांनी केलेल्या काव्यरचना पुढीलप्रमाणे आहेत.

१) रघुवंश

भारतीय टीकारांनी रघुवंश हे कवी कालिदासांचे सर्वोत्कृष्ट महाकाव्य मानलेले दिसते. रघुवंश या महाकाव्यात कवी कालिदासांच्या परिणीत प्रज्ञेचा विलास मांडण्यात आला आहे. यामध्ये १९ सर्ग व १५६९ श्लोक आहेत.[4] राजा दिलीप पासून अग्नीमित्रापर्यंतच्या इक्ष्वाकुवंशाचा इतिहास वर्णन करण्यात आला आहे. रघुवंश या महाकाव्यात कवी कालिदास राजाजवळ असलेली मानवता, त्यांची वेदना व संवेदना याचे चित्रण अतिशय सुंदर पद्धतीने करताना दिसतात. निसंतान असलेला व ग्रामस्थ गोपालांची विचारपूस करणारा राजा दिलीप, गुरुदक्षिणा मागायला आलेला कौत्स रागावून जाऊ नये म्हणून धडपडणारा रघु, मृगाचे डोळे पाहून पत्नीची आठवण येणारा राजा अज, दुर्दैवी शापाचा बळी ठरलेला अजाणता राजा दशरथ, राज कर्तव्यासाठी आपल्या पवित्र पत्नीचा त्याग करणारा लोककल्याणकारी राजा श्री राम अशा अनेक प्रसंगांना कवीने आपल्या प्रतिभेचा साज चढवून त्यातून भावपूर्ण चित्र निर्माण केलेले आढळते[5]. यामध्ये कथानुकूल रसनिर्मिती व रसानुकूल शब्दसंहिता ही कवी कालिदासांची वैशिष्ट्ये आपणास प्रकर्षाने आढळून येतात. आदर्श राज्य व्यवस्था, धर्मपालन आणि नैतिक मूल्य यांचे सशक्त चित्रण यामध्ये आढळून येते. प्रत्येक चित्रातील विविधता वेगवेगळ्या प्रयोजनामुळे आणखी खुलून दिसते. प्रत्येक वर्णनात तटस्थपणा आहे. त्यामुळे जिवंत संवाद वाचकांसमोर उभे राहतात. कालिदासांच्या साहित्य वैभवात शब्दप्रभुत्व, प्रसन्न, मधुर, शांत अशी भाषाशैली, स्वर झणकारासारखी निनादणारे सुभाषिते आणि उपमांचा वापर अतिशय सुंदर रितीने केलेल्या दिसून येतो.[6] रघुवंशीय राजानी गृहस्थश्रम व्रत पाळुन वंश संवर्धनाचे कर्तव्य पार पाडले, शत्रूवर पराक्रम गाजविला तो राज्य शासनाची प्रतिष्ठा राखण्यासाठी, अपार वैभव कमविले कारण दान करताना कोणतीही कमतरता भासू नये म्हणून, असे वर्णन रघुवंश या महाकाव्यात आढळून येते. समर्पित जीवनाचा व कर्तव्यदक्ष उपभोगाचा आदर्श या काव्यातून समाजाला देताना कवी कालिदास दिसून येतात.

[4] **प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास**

[5] **मराठी विश्वकोश खंड १४ पृ.क्र.३९५**

[6] **कित्ता ०२**

**myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)**

कलेच्या आनंदाबरोबरच श्रेयाचा अप्रत्यक्ष उपदेश करणारे हे काव्य रचण्यात आले आहे.[7] या काव्यामुळे त्यांना 'कवी कुलगुरू' अशी उपाधी लाभली असली तरी टीकाकार त्यांना 'रघुकार' म्हणणे पसंत करतात.[8]

२) कुमार संभव

कवी कुलगुरू कालिदासांची कुमार संभव हे सुंदर अशी संस्कृत रचना आहे. या महाकाव्यात १७ सर्ग १०९३ श्लोक संख्या आढळून येतात.[9] यातील पहिले ८ सर्ग खरे कालिदासांचे मानले जातात. या महाकाव्यात शिवपार्वती प्रेमाचे वर्णन करण्यात आले आहे. शिव-पार्वती विवाह आणि कुमार कार्तिकेय जन्माची कथा या महाकाव्यात आलेली आहे.

कुमार संभव या महाकाव्यात रेखीव निसर्ग वर्णने, प्रभावी स्वभाव चित्रण व त्यातून निर्माण झालेल्या उदात्त प्रेमाचे तत्वज्ञान आलेले असल्यामुळे ते रसिक मान्य झालेले दिसून येते. हिमालय वर्णन, पार्वती सौंदर्य वर्णन, मदन दहन, रतिविलाप व शिवपार्वती विवाह ही या काव्यातील सर्वात जास्त मनोवेधक सौंदर्य स्थळे वर्णन केलेले दिसून येतात. तसेच उग्र स्वभावाचे पण दयाशील असे शंकर, प्रेमाला आसुसलेली पण मानी स्वभावाची पार्वती, बढाईखोर असा मदन यांची स्वभावचित्रणे कवी कालिदासांनी मार्मिकपणे वर्णन केल्याचे दिसून येते. शृंगार, करूण, अद्भुत, हास्य निर्मिती हे महाकाव्याचे एक वैशिष्ट्य आहे. या काव्यामध्ये वीर रसाचा अतिशय सुंदर असा संगम झाल्याचे आढळते.

३) ऋतु संहार

महाकवी कालिदासांचे एक सुंदर संस्कृत रचना म्हणजे ऋतुसंहार होय. निसर्गाचे ऋतुचक्र मानवी भावनांना पल्लवी करते याचे सुंदर वर्णन या भावकव्यात आढळते. या काव्यामध्ये ग्रीष्म ते वसंत ऋतु असे सहा ऋतूंचे बहारदार वर्णन करण्यात आलेले आहे. कवी कालिदासांनी ऋतुसंहारामध्ये ऋतू चक्रांचे वर्णन ग्रीष्म पासून आरंभ करून वर्षा, हेमंत आणि शिष्य या ऋतूंचे क्रमशः दर्शन घडविले आहे.निसर्गाचे सर्वव्यापी सौंदर्य, माधुर्य आणि वैभवाने संपन्न अशा वसंत ऋतुसह या रचनेचा सुंदर शेवट केलेला आपणास दिसून येतो. प्रत्येक ऋतुचा मानवी जीवनावर होणारा अमुलाग्र बदल यामध्ये चित्रित करण्यात आला आहे[10].या महाकाव्यात सहा सर्ग असून प्रत्येक सर्गात १६ पासून २८ पर्यंत श्लोक संख्या आढळून येते. या महाकाव्यात प्रत्येक ऋतू वर्णन, त्या ऋतूंचां वृक्षवेलीवर व पशुपक्षांवर होणारा परिणाम चित्रीत करण्यात आला आहे. प्रेमात मग्न असणारी मानवी वृत्ती व त्या त्या ऋतूत त्यांच्या वृत्तीत होणारा बदल याचे वर्णन कवी कालिदासांनी या काव्यात केले

---

[7] **उपरोक्तपृ.क्र.०२**

[8] **भारतीय संस्कृती कोश पान नंबर ३०८**

[9] **उपरोक्त पृ.क्र.०२**

[10] **उपरोक्त पृ.क्र.०२**

आहे. ऋतुसंहार हे काव्य ग्रीष्माच्या दाहकतेपासून सुरू होऊन वसंत ऋतुच्या अल्हादापर्यंत संपल्याचे दिसून येते. या काव्यात कवी कालिदासाने निसर्गाला संपूर्णपणे सजीव व सचेतन बनविल्याचे आढळते. ऋतूसंहार या काव्यामध्ये भुजंगप्रयात, वंशस्त, वसंततिलिका, उपजती व मालिनी अशा वृत्तांचा वापर केलेला आढळतो. या महाकाव्यातील भाषा अनुप्रासात्मक,सरळ व स्वाभाविक प्रवाहने परिपूर्ण झालेली दिसून येते.

४) मेघदूत

हे कवी कालिदास यांच्या संस्कृत खंड काव्यापैकी एक आहे. यामध्ये जवळपास १११ श्लोक संख्या आढळून येतात. कुबेराचा शाप मिळाल्यामुळे यक्ष राजाला रामगिरीवर आठ महिने राहावे लागले. आषाढाच्या पहिल्या दिवशी वर्षा मेघाला पाहून आपल्या पत्नीला संदेश पाठवण्याची कल्पना त्याला सुचते व त्यातून मेघदुताची निर्मिती झालेली आपणास दिसून येते. म्हणूनच आपल्याला मेघदूत हे खंड काव्य अनुपम प्रतिभेचा विलासच म्हणावा लागेल. वियोगिनी कांतेला यक्ष राजाने मेघांच्या द्वारे भावपूर्ण संदेश पाठविल्याची अभिनव अशी कल्पना साकारल्याचे दिसते.

मेघदुतात असलेला प्रत्येक श्लोक स्वयंपूर्ण चित्रासारखा आढळून येतो. मेघदुताच्या पूर्वार्धात रामगिरी ते अलका या प्रवास मार्गाचे वर्णन करताना अनेक भौगोलिक प्रदेश, शहरे, नद्या, पर्वत, पक्षी इत्यादीचे चित्रण अतिशय रेखीवपणे केलेले आपणास दिसून येते. प्रेमाचे उत्कटता आणि विरहाचे जीवघेणी व्यथा येथे भावनांची मृदूता, अर्थांतरासारखे विश्वात्मकता आणि शब्दाचे लाघवी रुप यामध्ये प्रकट केलेले आहे[11]. यक्ष आणि त्याची अद्भुत नगरी, विरहाचे कारण, मेघांचे मनुषीकरण इत्यादी तपशील कविने काटेकोरपणे वर्णन केले आहे.

उत्तुंग कल्पनाविलास, भावनांचे हळुवार रेखाटन, कल्पनेला साकार करणारे शब्द प्रभुत्व या गुण संपदेमुळे मेघदूत अतिशय लोकप्रिय ठरल्याचे दिसून येते.[12]

नाट्यपरंपरेतील योगदान

प्राचिन भारतात नाट्य सादरीकरण हे केवळ मनोरंजन नव्हते. तर धार्मिक व सांस्कृतिक मूल्य प्रसारित करण्यासाठी त्यांची निर्मिती केली जात होती. तात्विक प्रश्नांचा शोध घेण्यासाठी आणि प्रेक्षकांना अध्यात्मिक साक्षात्कारकडे नेणारे, सौंदर्यात्मक अनुभव निर्माण करण्यासाठी त्यांची निर्मिती केली जात होती. कवी कालिदासांच्या नाटकात मानवी

[11] **मराठी विश्वकोश खंड १३.**

[12] **कित्ता पृ.०२**

मनात निर्माण होणाऱ्या भाववृत्तीचा अतिशय रमणीय अविष्कार निर्माण झालेला दिसतो. कवी कालिदासांच्या तीनही नाटकांच्या कथानकात प्रेम ही महत्त्वाची भावना चित्रित करण्यात आली आहे.

१) अभिज्ञानशाकुंतलम्

हे नाटक संस्कृत साहित्यातील सर्वोत्तम नाटक मानले जाते. शाकुंतल हे कवी कालिदासांचे अमर अशी कृती आहे. शकुंतलेचे विशुद्ध प्रेम, उदात्त त्याग व स्वर्गीय संगम यांचे कलात्मक चित्रण या नाटकात करण्यात आले आहे. निर्वाज्य, शालीन, पतीनिष्ठ अशा आर्य स्त्रीचा आदर्श शकुंतलेने या नाटकात दर्शविला आहे. शाकुंतलाची गणना जागतिक वांग्मयात केली जावी एवढ्या गुण प्रकर्षाने नटलेले हे काव्य आहे.

हे संस्कृत साहित्यातील सर्वात प्रसिद्ध सात अंकी नाटक असून राजा दुष्यंत आणि शकुंतला यांच्या प्रेमाची व विरहाची अमर कथा यात मांडण्यात आली आहे. दुष्यंत हा या नाटकाचा प्रमुख नायक असून शकुंतला ही या नाटकाची प्रमुख नायीका आहे. हे नाटक दुष्यंत आणि शकुंतला यांच्या प्रणय कथेवर आधारित आहे.

शिकारीसाठी दुष्यंत जंगलात गेला असता जवळच असलेल्या कण्व ऋषींच्या आश्रमात राजा दुष्यंतची भेट शकुंतलेशी होते.  या भेटीनंतर त्या दोघामध्ये प्रेम निर्माण होऊन त्याचे रूपांतर विवाह मध्ये होते. दुष्यंत आणि शकुंतलेचा गंधर्व विवाह होतो. विवाह नंतर "सैन्य घेऊन मी तुला न्यायला येईन" असे म्हणून दुष्यंत तेथून निघून जातो.  त्याचे प्रेमाचे प्रत्येक म्हणून अंगठी शकुंतलेला देऊन जातो. परंतु या प्रेमामुळे शकुंतलेचे दुर्वास ऋषींच्या आश्रमाकडे दुर्लक्ष होते. या क्रोधाने दुर्वास ऋषी दुष्यंतला शाप देतो आणि त्यांनी शकुंतले सोबत केलेल्या गंधर्व विवाहाचा त्याला विसर पडतो.

माशाच्या पोटातून निघालेल्या अंगठीचे मदतीने दुष्यंतला शकुंतलेचे झालेले विस्मरण दूर होते. सर्वदमन या दुष्यंत आणि शकुंतलेच्या पुत्राच्या मदतीने त्यांचे पुनर्मिलन हे नाटकाच्या शेवटी आपणास दिसून येते. या कथेवरून अभिज्ञानशाकुंतल हे नाटकाचे शीर्षक सार्थकी लागल्याचे आपणास दिसते[13].

शाकुंतलाची कथा सुटसुटीत व शेवटपर्यंत उत्सुकता टिकविणारी आहे. या नाटकामध्ये चित्रित करण्यात आलेला प्रत्येक प्रसंग हा सहेतुक निर्माण केला आहे. या नाटकाचा प्रारंभ शृंगार रसाने होत असून शेवट हा शांती रसात होताना आपणास दिसून येतो.

दुष्यंत आणि शकुंतला यांच्या प्रेम कथेच्या माध्यमातून प्रेम, स्मृती, नियती आणि कर्तव्य इत्यादी भाव प्रकट होताना दिसून येतात. शृंगार रस हा या नाटकातील प्रधान रस असुन करूण,अद्भुत आणि हास्य हे यातील दुय्यम रस आहेत.

[13] Medbox.iiab.me

**myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)**

२) विक्रमोर्वशीयम्

हे कवी कालिदासांचे पाच अंकी नाटक असून या नाटकामध्ये स्वर्गातील अप्सरा उर्वशी व मृत्यूलोकातील राजा पुरुरवा यांच्या वैदिक प्रेम कथेवर विक्रमोर्वशीयम् या नाटकाची रचना करण्यात आलेली दिसून येते. मानवावर प्रेम करणारे स्वर्गीय अप्सरा उर्वशी एक दिव्य स्त्री या नाटकाखेरीज अन्य कोणत्याही संस्कृत नाटकात आपणास आढळून येत नाही. पती सहवासासाठी पुत्राचा त्याग करणारी उर्वशी व प्रिय प्रेमाने वेडा होणारा राजा पुरुरवा यांच्या स्वभावातील विरोध कुशलतेने रेखाटण्यात आलेला दिसतो. कवी कालिदास यांनी या नाटकात प्रेमाची कोमलता, विरहाचे वेदना आणि दैवी हस्तक्षेप यांचे सुंदर मिश्रण साकारण्याचे दिसून येते. विविध प्रसंग, गैरसमज, विरह आणि दुःखानंतर अखेरीस दोघांचेही पुनर्मिलन या नाटकामध्ये दाखविण्यात आले आहे. या नाटकात शृंगार रसावर भर देण्यात आला आहे. तसेच हास्य आणि अद्भुत या दोन्ही रसांचा थोड्या प्रमाणात समावेश करण्यात आला आहे. नाटकाची भाषिक कला, तात्विक सखोलता आणि भावनिक व्याप्ती याला शास्त्रीय संस्कृत नाट्यकलेचे पराकाष्ठा म्हणून चिन्हांकित होताना दिसते. या नाटकाचा शेवट हा सुखांत म्हणजेच आनंददायी करण्यात आला आहे.

३) मालविकाग्निमित्रम्

कवी कुलगुरू कालिदास यांच्या सुखात्मक स्वरूपाचे हे नाटक आहे. या नाटकामध्ये पाच अंक आहेत. या नाटकाचा कालखंड निश्चितपणे सांगता येत नसला तरी हे नाटक पहिल्या शतकात तयार केले असावे असे मानले जाते. कालिदासांच्या या नाटकाचा नायक हा ऐतिहासिक आहे. शेवटच्या मौर्य सम्राटाला मारून त्याच्या गादीवर बसणारा त्याचा सेनापती पुष्पमित्र त्यांचा हा पुत्र अग्निसेन होय. या पुष्पमित्राने अश्वमेध यज्ञ केला होता[14].

शृंगराज अग्नीमित्राच्या दरबारी प्रेम प्रकरणावर मालविकाग्निमित्रम् उभारणी करण्यात आली आहे. ज्या राजाची राणी होण्यासाठी विदर्भ राजकन्या मालविका निघालेली त्याच्याच अंतपुरात दासी होण्याचे तिच्या नशिबी आले. तिच्याजवळ असलेल्या लावण्याने व नृत्य कौशल्याने तिने राजाचे चित्त तिने वेधून घेतले. राणीच्या विरोधावर मात करून मालविका राजाची पट्टराणी बनते हे कथानक मालविकाग्नीमित्रम् या नाटकामध्ये चित्रित करण्यात आली आहे. या नाटकामध्ये खटकेबाज संवाद, प्रभावी वर्णन शैली व कथानकांची गतिमानता उल्लेखनीय दिसून येते. या नाटकाचे कथानक थोडेसे गुंतागुंतीचे असले तरी त्याची मांडणी कवी कालिदासानीं अगदी व्यवस्थितपणे केलेली दिसून येते. शृंगार हा नाटकाचा प्रमुख रस वर्णन करण्यात आला आहे. वैचित्रपूर्ण प्रसंगाचे निर्मिती करून नाटकाचे रंगत वाढवण्याचे काम कवी कालिदासांनी केलेलं आहे. कवी कालिदासांनी या नाटकांमध्ये राजाच्या अंतपुरामध्ये विकसित होणारे काम, प्राण्यांमध्ये आपापसातील

[14] **मराठी विश्वकोश खंड १३**

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

इर्षा, राजाची कामुकता, राणीजवळ असलेली धीरता व उदात्त भावनेचे चित्रण अतिशय सुंदर पद्धतीने करण्यात आलेले आहे. नाट्यकलादृष्टीने हे नाटक अतिशय सुंदर असून त्याची भाषा ही प्रासादिक व मनोरम अशी आढळते .

निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनाच्या आधारे असे निदर्शनास येते की, कवी कालिदास यांचे साहित्य महाकाव्य आणि नाट्यपरंपरा या दोन्ही साहित्यप्रकारांच्या उत्कर्षबिंदूचे प्रतिनिधित्व करते. त्यांच्या साहित्यनिर्मितीमध्ये आशय, रचना, शैली आणि तत्त्वदर्शी दृष्टिकोन यांचा सुसंवादी संगम आढळतो. विशेषतः रससिद्धांताच्या अंगाने केलेले परीक्षण दर्शविते की शृंगार, वीर आणि करुण रसांचे त्यांनी केलेले प्रकटीकरण केवळ शास्त्रीय मर्यादांचे पालन करणारे नसून, ते मानवी अनुभवविश्वाच्या सखोल अभिव्यक्तीचे द्योतक आहे.

कालिदासांच्या काव्यभाषेचे विश्लेषण करताना अलंकारविधानातील संयम, उपमा-रूपकांची सांकेतिक शक्ती, तसेच प्रतिमासृष्टीतील दृश्यात्मकता यांचे स्पष्ट दर्शन घडते. त्यांच्या रचनांमध्ये निसर्ग आणि मानव यांचा सहास्तित्ववादी संबंध दिसतो, जो भारतीय सांस्कृतिक तत्त्वज्ञानाशी निगडित आहे. यामुळे त्यांच्या साहित्याचा आशय केवळ काव्यसौंदर्यापुरता मर्यादित राहत नाही, तर तो सांस्कृतिक, नैतिक आणि तत्त्वचिंतनात्मक अधिष्ठान अधोरेखित करतो.

नाट्यपरंपरेच्या दृष्टीने विशेषतः अभिज्ञानशाकुंतलम् सारख्या नाटकांनी संस्कृत नाट्यसृष्टीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. कथानकाची रचनात्मक मांडणी, पात्रांचे मनोवैज्ञानिक चित्रण आणि संवादातील लयबद्धता यांमुळे कालिदासांची नाट्यदृष्टी आधुनिक साहित्योत्तर समीक्षेच्या निकषांवरही प्रभावी ठरते.

स्त्रीप्रतिमेच्या संदर्भात त्यांच्या साहित्याचे चिकित्सक विश्लेषण दर्शविते की स्त्री ही केवळ सौंदर्याचे प्रतीक नसून नैतिक बळ, सहनशीलता आणि निर्णयक्षमता यांचेही प्रतिनिधित्व करते. त्यामुळे कवी कालिदासांचे साहित्य भारतीय सामाजिक रचनेतील मूल्यव्यवस्थेचे प्रतीकात्मक दस्तऐवजीकरण ठरते.

तसेच त्यांच्या साहित्याचे विविध पाश्चिमात्य भाषांमध्ये झालेले भाषांतर आणि त्यावरील जागतिक समीक्षात्मक चर्चा यांमुळे त्यांच्या काव्याची सार्वत्रिकता सिद्ध होते. महाकाव्य ते नाट्यपरंपरा या प्रवासात कालिदासांनी संस्कृत साहित्याला केवळ कलात्मक उंची प्रदान केली नाही, तर भारतीय संस्कृतीला विश्वसाहित्याच्या पटलावर भक्कम स्थान मिळवून दिले.

अर्थात, प्रस्तुत अभ्यासातून असे निष्कर्षित होते की कालिदासांचे साहित्य हे कालातीत, मूल्यप्रधान आणि जागतिक संदर्भात अभ्यासण्याजोगे आहे. त्यांच्या साहित्यनिर्मितीने भारतीय साहित्यपरंपरेला सौंदर्य, तत्त्वचिंतन आणि मानवतावादी दृष्टिकोन यांचे शाश्वत अधिष्ठान दिले आहे. त्यामुळे ते भारतीय तसेच जागतिक साहित्यविश्वातील एक महत्त्वपूर्ण आणि अनुकरणीय साहित्यपुरुष म्हणून कवी कालिदास अधोरेखित होतात.

**myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)**

संदर्भ ग्रंथ

१) प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास

२) मराठी विश्वकोश खंड १४

३) भारतीय संस्कृती कोश

४) मराठी विश्वकोश खंड १३.

५) महाकवी कालिदास का साहित्यिक योगदान-डॉ. प्रशांत ब. बिराडकर (शोध निबंध)

६) कवी कालिदास- वा.वी. मिराशी

७) मराठी विश्वकोश आवृत्ती दुसरी.

८) Vishvakosh, marathi.gov.in

९) Itihas.ai.

१०) Medbox.iiab.me